महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001
e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्र. नाविमं / उमागो / प्रात्यक्षिक / ३७५३
नागपूर, दि.२४/१२/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
भंडारा / चंद्रपूर / नागपूर / वर्धा / गडचिरोली / गोंदिया.

**विषय** :– फेब्रु / मार्च २०२५ मध्ये घेण्यात येण्याऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) ची लेखी, प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा परीक्षांबाबत

**संदर्भ** :– १) राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं./ परीक्षा–६ / ४५०५ पुणे–४११००४ दि. २१/११/२०२४
२) राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं./ परीक्षा–६ / ४८४६ पुणे–४११००४ दि. १६/१२/२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयाला अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दि. ११/०२/२०२५ पासून आयोजित करण्यात आलेली आहे. याबाबतचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२वी ) प्रात्यक्षिक परीक्षा व इतर तत्सम परीक्षा शुक्रवार दिनांक २४/०१/२०२५ ते सोमवार दिनांक १०/०२/२०२५ या कालावधीत आयोजीत करणेबाबत कळविण्यात आले आहे.

उपरोक्त प्रात्यक्षिक परीक्षा कालावधीत काही विद्यार्थ्यांची जेईई ची परीक्षा असण्याची शक्यता आहे. जेईई परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा, जेईई परीक्षेच्या दिवशी येत असेल तर अश्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक व तत्सम परीक्षा मंडळाच्या उपरोक्त नियोजित प्रात्यक्षिक परीक्षा कालावधीत अन्य दिवशी घेण्यात यावी.

**उपरोक्त प्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन ची परीक्षा नियोजित परीक्षा कालावधीत देऊ शकणार नाही अश्या विद्यार्थ्यांची सदर परीक्षा,लेखी परीक्षेनंतर Out Of Turn दि. १२/०३/ २०२५, दिनांक १५ /०३/ २०२५ व दिनांक १७ /०३/ २०२५ रोजी आयोजित करण्यात यावी.**

प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा व Out Of Turn परीक्षा वेळापत्रका प्रमाणेच होतील, यांची नोंद घ्यावी.

(संकेतस्थळ www.mahahsscboard.in)

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रत माहितीस्तव तथा योग्य कार्यवाहीस्तव:–
१) मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे–४ यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित
२) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित
३) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक व उच्च माध्यमिक) जि. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून देणे.